## म्हैसाळचे सुपुत्र : आबासाहेब शिंदे

– बापू जाधव

महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाचा कायापालट करणाऱ्या व्यक्तींमध्ये कै. आबासाहेब शिंदे, म्हैसाळकर यांचा समावेश आवर्जून करावा लागेल. पारंपरिक पद्धतीने दुमडून गेलेल्या शेतकरीवर्गाला आणि प्रामुख्याने कोरडवाहू रानाचा तुकडा आयुष्यभर सांभाळून स्वत:चा उदरनिर्वाह न करता येणाऱ्या अल्पभूधारकांना जलसिंचन योजना जीवदान ठरल्या. सांगली जिल्ह्यात नद्यांचे पोट फोडून शेतकऱ्यांच्या जीवनातील बदल करण्याचे त्यांचे स्वप्न त्यांनीच पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. यास सांगली जिल्ह्याच्या जलसिंचन योजनाच साक्ष देतात. राजकारणाचा बुरखा पांघरणाऱ्यांनी ते सांगण्याची गरज नाही.

सांगली जिल्ह्यात कार्य एकाचे आणि जयजयकार दुसऱ्याच्या नावाचा हा इतिहासही जिल्ह्याचाच काय पण महाराष्ट्रालाही नवा नाही. सामान्यातल्या सामान्य माणसाला राजकारणतली उच्चभ्रू पदे मुक्त हस्ते उधळून वैयक्तिक माणसाला मोठे केले जाण्याचा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात खूप आहे. कर्तृत्व, श्रध्दा आणि प्रत्यक्ष योजना अशा तिहेरी संगामातून स्वहिताची कास न धरता सर्वसामान्य माणसांच्या मनात घर करून जाण्याचे सामर्थ्य कै. आबासाहेबांच्यात होते.

आज तरी अशाच ध्येयवेड्या माणसाची गरज समाजकारणाला, राजकारणाला आणि महाराष्ट्राच्या कायापालटाला आहे आणि दुर्दैवाने अशी माणसंही एका हाताच्या बोटावर मोजण्याइतपत आहेत याची खंत वाटल्याशिवाय राहात नाही.

बालपणापासूनच त्यांच्या जीवनचरित्राचा सूक्ष्मपणे विचार करता एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते ती म्हणजे आबासाहेब समाजसेवक होते. रयतेचे सेवक होते, ते राजकारणी नव्हते. धुरंधर राजकारणी समाजसेवकाची भूमिका पार पाडीत असतात असे दृश्य अत्यंत दुर्मिळ आहे. पण राजकीय माणसांनीच त्यांना राजकीय वातावरणत गुंतवून 'राजकारणी' असा शिक्कामोर्तब केले. एका अर्थी त्याना राजकारणी माणसांनीच 'राजकारणी' केले. समाजसेवेच्या व रयतेच्या सेवेचा त्यांच्या कार्याचा गवगवा राजकीय नेत्यांना शह देऊन जात होता हे बुद्धिवंतच काय पण सामान्य नागरिकसुद्धा मान्य करतील. समाजसेवेचे व्रत श्रीमंत मनाच्या श्रीमती शांतादेवी या परमपूज्य आईकडून घेतलेले. देशप्रेमाने ओथंबून गेलेल्या या समाजसेविकेने 'परकीय कापडाच्या होळी' त म. गांधींना साक्ष ठेऊन स्वत:च्या परकीय कपड्यांची होळी केली होती. मालवणच्या भूमीत या घटनेचा परिणाम आपल्या मुलावर सहज झाला असे घडले नसते तरंच नवल !

जीवनातील गरिबीचे अनुभव भोगले आणि श्रीमंतीचा आस्वादही लुटला पण कधी उतले नाही, मातले नाही. गर्वाचा लवलेशही नाही. या संस्काराने 'केदारलक्ष्मी' घर, आगळेवेगळे रूप घेऊन समर्थपणे उभे आहे. राजकारणी माणसांच्या आवाहनाला तोंड देत.

जमिनीला पाणी हवे हा शेतकऱ्यांचा मंत्र आबासाहेबांनी ओळखला होता. ही भूमी संपन्न झाली तरच शेतकरी जगणार आहे. त्याची प्रगती होणार आहे नाहीतर तो उपेक्षित राहणार याची जाणीव त्यांनी सदैव ठेवली होती. म्हणूनच त्यास रयतेचा सेवक म्हणणे उचित ठरेल. रयत सेवक या भूमिकेतून त्यांच्याकडे पाहत असताना केवळ जलसिंचन योजना हेच त्यांचे स्वप्न नव्हते.

परिसरातील शेतकरी पतहीन होता. दावं आहे, पण बैल नाही, बैल आहे, पण वैरण नाही आणि हे सारं आहे, पण जमीन सावकाराकडे गहाण आहे. सोडवून घ्यावी तर तेथे पाणी नाही. कोरड्या रानात शेतकऱ्याने अश्रू टाकल्याखेरीज पाणी नाही. नदीकाठच्या शेतकऱ्यांना जलसिंचन योजनेचा लाभ होईल पण ज्यांची शेती नदीपासून खूप दूर अंतरावर आहे अशा शेतकऱ्यांना विहिरीसाठी कर्ज कोण देणार? 'प्रकरण' करायला साताऱ्याला कोण जाणार? त्यास गाडीखर्च कोण देणार? या साऱ्या वेदनांनी ते पेटून उठले आणि 'सांगली जिल्हा भूविकास बँके'ची स्थापना केली. याच काळात या बँकेने शेतकऱ्यांना मदत केली आणि १९७२ च्या दुष्काळाशी अल्पच प्रमाणात का होईना पण सामना करता आला.

'समाजसेवक' असा नामोल्लेख करताना त्यांच्या गरुड मनाची उंच भरारी सहज नजरेत भरण्यासारखी आहे. दुर्बल घटकांना वाली नाही हे पदोपदी जाणवू लागले. मोटारीच्या आडवे येणारे डोक्यावर ओझे असलेले मुस्लिम बागवानांना पाहून मन द्रवले. असंख्यांना या वेदना होत्या. पतहीन असणारांना बनविण्यासाठी आर्थिक शोध सुरु झाले आणि खारीच्या वाट्याने त्यांच्याकडून चार–चार आणे जमा करून भिशी काढली. कष्टाळू हात प्रामाणिक असतात हा अनुभवही आला आणि त्यांनी 'यशवंत नागरी सहकारी पतसंस्था' निर्माण केली. केवळ पतसंस्थेवर ही पाऊलवाट थांबली नाही. सामान्य माणसांना अर्थपुरवठा करणारी बँक त्यामधूनच उदयाला आली. सामान्य नागरिकांची आर्थिक अडचण दूर झाली. वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी आबासाहेबांनी फार वर्षापूर्वी आखली होती याचे उत्तम उदाहरण ही नागरी पतसंस्था होय.

राजकीय माणसांनी त्यांना राजकारणात खेचले असावे. त्यांच्या विचारसरणीला त्या काळातील काँग्रेस तत्त्वे पटली होती. हाती घेतलेल्या कामांची पूर्तता करणे, सामाजिक गरजेसाठी एखादी संस्था उभी करणे आणि संस्था मोठी झाली की तेथून निघून जाणे कशाचीही अभिलाषा, अपेक्षा न ठेवता. एका भाषणात ते म्हणाले होते, 'सामाजिक कार्यकर्त्याला कार्येच जर करावयाची असतील तर समाजात प्रचंड कार्य आहे. आपण पुन: जन्म घेतला तरीसुद्धा समाजकार्य पूर्ण होत नाही. समाजाचा मी एक पाईक आहे आणि सामाजिक कार्य हीच माझी पूजा आहे.
त्यांच्या जीवनपटलातील कितीतरी प्रसंग आज डोळ्यांसमोर उभे राहतात. धनगरांची मेंढरं पावसामुळे रानात अडकली आणि रानातून स्वत:च्या खांद्यावरून मेंढरं आणून ती स्वत:चं मोटारीतून सुखरूप पोहोच करणारा समाजसेवक दुर्मिळ आहे.

शेतकऱ्यास कर्ज अपुरे पडले तर आपल्या खिशातील पैसे देऊन विहिरीची वास्तूशांती घालणारा हा शेतकरी सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देवासमान आहे. मृत्यूसमयी आईला खांदा द्यावा तो मुलाने, अशी एका मुस्लिम आईची इच्छा आणि तो मुलगा जेलमध्ये – त्यास स्वत: जामीन राहून आईच्या भावना पूर्ण करणारा हा मानसपुत्र आणि मृत्युसमयी एका तरुणाची नोकरीची ऑर्डर घेऊन समाजाकार्य करता करता हसतमुखानं निरोप घेणारं हे व्यक्तिमत्व आगळवेगळं आहे.

खानदानी राजबिंडा पुरुष शेतकऱ्यांच्या भाकरीसाठी – पोटासाठी जीवनभर कष्ट उपसत राहिला. हरितक्रांतीच्या स्वप्नाने तो बहरुन गेला एक फूल बनून. आम्हीच ग्रामवासी करंटे ! आम्हाला ओळखता आले नाहीत पण तो अभेद्य, अजिंक्य तारा अमर तसाच राहिला. समाजसेवेच्या रुपातून, कार्याच्या भगिरथ प्रयत्नांमधून त्यांचे प्रतिक आजही उजळून निघते आहे. राजकीय माणसं त्यांच्या नावाला, कार्याला डावलतात ही आम्हास सामान्य माणसांची खंत आहे. ही खंत दूर व्हावी इतके घडले तरी पुरे, हीच अपेक्षा !